MHJG100016762022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १७/१०/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | १७/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | : | १२/०६/२०२३ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०० ०७ २७ |

## भाग –अ

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्रमांक २),भुसावळ ता.भुसावळ,**
**जि.जळगाव यांचे न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी)

**नियमित फौजदारी खटला क्रमांक : २९५/२०२२**

**निशाणी क्रमांक : ४१/ब**

| न्यायनिर्णय दिनांक : १२/०६/२०२३ | |
|---|---|
| प्रथम खबर अहवाल / अपराध क्र. २२६/२०१९ | शहर पोलीस स्टेशन, भुसावळ, भा. द. वि. कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>मार्फत : प्रभारी अधिकारी,<br>शहर पोलिस ठाणे,<br>भुसावळ ता.भुसावळ जि.जळगाव |
| **अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता** | श्री. ए.ए.चुकेवाड, सहा.सरकारी अभियोक्ता |
| विरूद्ध | |
| **आरोपी** | १. मोहम्मद सिद्दीक जमशेर खान<br>वय–७० वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>२. अजिमुनिसा सिद्दीक खान<br>वय – ६५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>३. सुनिल शंकर चिखलकर<br>वय – ४८ वर्षे, व्यवसाय – मजुरी, |

| | |
|---|---|
| | ४. नुर मोहम्मद सिद्दीक खान<br>वय – ४८ वर्षे, व्यवसाय – मजुरी<br>सर्व राहणार न्यु पोर्टर चाळ, समता नगर जवळ, भुसावळ ता.भुसावळ जि.जळगाव |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | ॲड. नरेंद्र लोखंडे |

## भाग –ब

**[ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ११.१०.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १२.१०.२०१९ |
| चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक | १७.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०४.०५.२०२३ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक | २३.०५.२०२३ |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | ०६.०६.२०२३ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०६.०६.२०२३ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | -- |

# आरोपींचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोहम्मद सिद्दीक जमशेर खान | निरंक | ०४.०५. २०२३ | भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | आरोपींना निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |
| २ | अजिमुनिसा सिद्दीक खान | निरंक | ०४.०५. २०२३ | | | निरंक | निरंक |
| ३ | सुनिल शंकर चिखलकर | निरंक | ०४.०५. २०२३ | | | निरंक | निरंक |
| ४ | नुर मोहम्मद सिद्दीक खान | निरंक | ०४.०५. २०२३ | | | निरंक | निरंक |

# भाग –क

## [ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

**अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | इम्रान अली शब्बीर अली | फिर्यादी |
| सा.क्र. २ | शब्बीर अली मेहेर अली | साक्षीदार |
| सा.क्र. २ | नसीमो बानो शब्बीर अली | साक्षीदार |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| को.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी पी–३२/सा.क्र.१ | फिर्यादीचा जबाबावरील सही |
| २. | निशाणी पी–३३/सा.क्र.१ | फौ.प्र.सं.कलम १६४ च्या जबाबावरील सही |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी पी–३४ | इंजुरी सर्टीफिकेट |
| २. | निशाणी पी–३५ | इंजुरी सर्टीफिकेट |
| ३. | निशाणी पी–३६ | घटनास्थळ पंचनामा |

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल :**

| अनुक्रमांक | मुददेमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

सरकारी अभियोक्ता ए.ए.चुकेवाड व आरोपी पक्षातर्फे अधिवक्ता एन.पी.लोखंडे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर आलेला पुरावा व उभय पक्षांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून मी त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक ११.१०.२०१९ रोजी १४:०० वाजताच्या सुमारास भुसावळ शहरात न्यु पोर्टर चाळ, समता नगर येथे फिर्यादीच्या घरासमोर तालुका भुसावळ जिल्हा जळगाव | |

आरोपी क्र.१ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदार यांना आरोपी क्र.४ ने डोक्यावर कुऱ्हाडीने मारून त्यांना ईच्छापूर्वक दुखापत केली आणि कुऱ्हाडीचा गुन्हयातील हत्यार म्हणून वापर केला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? ...**नकारार्थी**

२. अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारिख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदार यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करून ईच्छापूर्वक साधी दुखापत केली आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? ...**नकारार्थी**

३. अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारिख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदार यांचा उद्येशपुर्वक अपमान करून त्याला प्रक्षोभीत केले व त्याच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य करण्यास उद्युक्त केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? ...**नकारार्थी**

४. अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारिख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरनार्थ फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकडपटशा केला व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला? ...**नकारार्थी**

५. कोणता आदेश ? ...**अंतीम आदेशाप्रमाणे**

## कारण मिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोप सिद्धी पुष्ठयर्थ फिर्यादी इम्रान अली शब्बीर अली (सा.क्र.१) याची साक्ष निशाणी क्र. ३१ वर नोंदविली. जखमी साक्षीदार शब्बीर अली मेहेर अली (सा.क्र.२) याची साक्ष निशाणी क्र. ३७ वर नोंदविली आणि नसीमो बानो शब्बीर अली (सा.क्र.३) याची साक्ष निशाणी क्र. ३८ वर नोंदविली. फिर्यादी व आरोपी यांच्या मध्ये सदर प्रकरणासंदर्भात तडजोड झालेली असल्यामुळे तशी तडजोड पुरसिस (निशाणी क्र.३०) दाखल करण्यात आली. आरोपी पक्षामार्फत फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे इंजुरी सर्टीफिकेट (निशाणी क्र.३४ व ३५) आणि घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. ३६) हे मान्य करण्यात आले. फिर्यादीने आपला पुरावा निशाणी क्र. ३९ वर पुरसिस दाखल करून बंद केला.

मुद्या क्रमांक १ ते ४ बाबत :-

३. मुद्या क्रमांक १ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीत चर्चिले आहेत. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी इम्रान (सा.क्र.१) याने आपल्या पुराव्यात असे सांगितले की, घटना ही तीन ते चार वर्षांपूर्वी दुपारच्या वेळेस घडली. परंतु त्याला घटनेची तारीख सांगता येत नाही. आरोपी क्र.४ नुर मोहम्मद याने त्याला शिवीगाळ केली होती. त्यामुळे त्याने आरोपींविरूद्ध तक्रार दाखल केली होती. याव्यतिरीक्त इतर कोणतीही घटना ही घडली नव्हती. त्याला फिर्यादी जबाब आणि फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वयेचा बयाणातील मजकुर हा माहिती नाही. त्याने अभियोग पक्षास त्याच्या सरतपासादरम्यान कोणतेही सहाय्य न केल्याने अभियोग पक्षाने त्याला फितुर घोषित करून त्याचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासादरम्यान त्याने अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. त्याने अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये असे सांगितले की, आरोपी क्र. ४ ने त्याला व त्याच्या आईला शिवीगाळ केली होती. त्याला त्याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ व ब मधील आणि फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वयेचा बयाणातील अधोरेखांकित भाग अ मधील मजकूर माहिती नाही. त्याने उलटतपासामध्ये पुढे असे सांगितले की, आरोपीने त्याला व त्याच्या वडिलांना कुऱ्हाडीने मारहाण केली नाही आणि त्याच्या आईला देखील आरोपीने मारहाण केली नाही. आरोपींनी त्यांना अश्लील शब्दामध्ये

शिवीगाळ देखील केली नाही. त्याने त्याच्या उलटतपासामध्ये पुढे असे सांगितले की, सदर प्रकरणासंदर्भात त्याच्या मध्ये आणि आरोपींच्या मध्ये तडजोड झाली असून तडजोडीने सदरचे प्रकरण हे मिटले आहे व त्यासंदर्भात तशी तडजोड पुरसिस ही त्यांनी सदर प्रकरणात दाखल केली असल्याचे सांगितले.

४. शब्बीर अली (सा.क्र.२) व नसीमो बानो (सा.क्र.३) हे फिर्यादीचे आईवडिल असून ते जखमी साक्षीदार आहेत. त्यांनी आपल्या पुराव्यात असे सांगितले की, फिर्यादी व आरोपी क. ४ यांच्या मध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यांना आरोपीनी कोणतीही मारहाण केली नाही. त्यांचा पोलिसांनी कोणताही जबाब हा नोंदविलेला नाही. त्यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय न केल्याने अभियोग पक्षाने त्यांना फितुर घोषित करून त्यांचा उलटतपास घेतला परंतु उलटतपासादरम्यान त्याने अभियोग पक्षास कोणतेही सहाय केले नाही. त्यांनी अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटपासामध्ये आरोपींनी त्यांना व फिर्यादीला कोणतीही मारहाण केली नाही असे सांगितले.

५. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी इम्रान अली (सा.क्र.१) याने त्याच्या सरतपासादरम्यान त्याला घटेसंदर्भात काही माहिती नसल्याचे सांगून त्याला फिर्यादी जबाबातील मजकूर माहिती नसल्याचे सांगितले. त्याने त्याच्या उलटतपासादरम्यान त्याच्या मध्ये आणि आरोपींच्या मध्ये सदर प्रकरणासंदर्भात तडजोड झाल्याचे सांगून त्यास पुरक अशी तडजोड पुरसिस निशाणी क्र.३० नुसार दाखल केली. त्यावरून सदर प्रकरणासंदर्भात फिर्यादी व आरोपींच्या मध्ये तडजोड झाल्याचे दिसून येते. शब्बीर अली (सा.क्र.२) आणि नसीमो बानो (सा.क्र.३) हे जखमी साक्षीदार असून त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नसल्याचे सांगितले तसेच पोलिसांनी त्यांचा कोणताही जबाब नोंदविला नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांच्या साक्षीची अभियोग पक्षास कोणतीही मदत होत नाही.

६. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील फिर्यादी व जखमी साक्षीदारांचे इंजुरी सर्टीफिकेट (निशाणी क्र. ३४ व ३५) आणि घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. ३६) हे मान्य करण्यात आले आहे. परंतु अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी इम्रान अली (सा.क्र.१), शब्बीर अली (सा.क्र.२) आणि नसीमो बानो (सा.क्र.३) यांनी त्यांच्या

पुराव्यामध्ये आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नाही असे सांगितले. त्यामुळे इंजुरी सर्टीफिकेट मध्ये नमूद केलेल्या जखमा या आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण केल्याने झाल्या असे म्हणता येत नाही. अभियोग पक्षाने फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटल्याने व त्यास पुरक अशी तडजोड पुरसिस निशाणी क्र.३० अन्वये फिर्यादी व आरोपी यांच्या मार्फत दाखल केली असल्याने अभियोग पक्षाचा पुरावा हा निशाणी क्र.३९ अन्वये पुरसिस दाखल करून बंद केला. त्यामुळे एकूणच अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी इम्रान (सा.क्र.१), शब्बीर अली (सा.क्र.२) आणि नसीमो बानो (सा.क्र.३) यांच्या पुराव्याचे आणि तडजोड पुरसिस (निशाणी क्र.३०) याचे अवलोकन केले असता. सदरचे प्रकरण हे फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोडीने मिटल्याचे दिसून येते.

७. एकूणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी इम्रान अली (सा.क्र.१), शब्बीर अली (सा.क्र.२) आणि नसीमो बानो (सा.क्र.३) यांचा पुरावा हा आरोपींविरुध्द लावलेले आरोप शाबीत करण्यास तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी इम्रान अली (सा.क्र.१), शब्बीर अली (सा.क्र.२) आणि नसीमो बानो (सा. क्र.३) यांच्या पुराव्याचे आणि तडजोड पुरसिस (निशाणी क्र.३०) याचे अवलोकन केले असता. सदरचे प्रकरण हे फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोडीने मिटल्याचे दिसून येते. तसेच अभिलेखावरील फिर्याद व जप्ती पंचनामा हा शाबीत झालेला नाही. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द लावलेले आरोप हे संशयापलीकडे जाउन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपींना देणे न्यायोचित होणार आहे. अभियोगपक्ष हा आरोपींविरूध्द लावलेले भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेंचे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला. सबब मी मुद्दा क्र. १ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

८. एक लाकडी पोकळ दांडा असलेली लोखंडी कु–हाड, एक स्टील पॉलीश असलेला लोखंडी रॉड, दोन विटांचे तुकडे, दोन लहान दगड उपयोगहिन व मुल्यहिन असलयाने ते अपील कालावधीनंतर नियमानुसार नाश करणे हे न्यायोचित होणार आहे.

**मुद्या क्रमांक ५ बाबत :**

९. मुद्या क्र. १ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरून मुद्दा क. ५ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ मोहम्मद सिद्यीक जमशेर खान, आरोपी क्र.२ अजिमुनिसा सिद्दीक खान, आरोपी क्र.३ सुनिल शंकर चिखलकर, आरोपी क्र.४ नुर मोहमंद सिद्यीक खान यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र आणि जामीनदाराने दिलेले जामीन रद्य करण्यात येते.

३. गुन्हयातील जप्त मुददेमाल एक लाकडी पोकळ दांडा असलेली लोखंडी कु–हाड, एक स्टील पॉलीश असलेला लोखंडी रॉड, दोन विटांचे तुकडे, दोन लहान दगड उपयोगहिन व मुल्यहिन असलयाने ते अपील कालावधीनंतर नियमानुसार नाश करावे,

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रू.७,५००/– इतक्या रक्कमेचा वैयक्तीक जातमुचलका दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

ठिकाण : भुसावळ
दिनांक : १२/०६/२०२३

**(श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामी)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.२), भुसावळ